महाराष्ट्र शासन
सहसंचालक
उच्च शिक्षण,मुंबई विभाग,मुंबई.
एलफिस्टन तंत्र विद्यालय आवार, ३ महापालिका मार्ग,मुंबई-४००००१.

ई.मेल -Jdhemumbai@gmail.com दूरध्वनी क्रं. ०२२-२२६५६६००

क्र.वेप/ससं/उशि/मुंवि/प्रमाणपत्र/२०१६/ LPC दिनांक : ९/ ७ /२०१६

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, शासन आदेश क्र. एनजीसी-२०१६/(१०२/१६)/मशि-४ दि.४/७/२०१६ नुसार, जोगेश्वरी एज्युकेशन सोसायटीचे, जीईएस कॉलेज ऑफ कॉमर्स, सायन्स, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, अरविंद गांधिर कॅम्पस, जोगेश्वरी(पू),मुंबई-६० या महाविद्यालयास शासन आदेशामधील अटी व शर्तीना अनुसरून तात्पुरती स्वरूपात नवीन पदवी स्तरावर **बी.कॉम.(ए अँन्ड एफ)(०-६०)** या नवीन अभ्यासक्रम/विषय/अतिरिक्त तुकडीस सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून उपरोक्त शासन मंजूरी आदेशातील अटी व शर्तीना अनुसरून **कायम विना अनुदानित तत्वावर** सुरू करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. शासन आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे संस्था/महाविद्यालयाकडून रू.१००/- च्या भारतीय गैर-न्यायिक मुद्रांक पेपरवर उपरोक्त अभ्यासक्रम चालविण्यासाठी शासनाकडून भविष्यात कोणत्याही स्वरूपातील अनुदानाची मागणी केली जाणार नाही, असे हमीपत्र महाविद्यालयाकडून/संस्थेकडून शासन निर्देशाप्रमाणे या कार्यालयाकडे सादर केलेले आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा-१९९४ अंतर्गत तरतूदीनुसार मर्यादित विद्यार्थी प्रवेश, नियतकालिक आढावा, नॅक ॲक्रिडीएशन बाबत करावयाची कार्यवाही आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार शैक्षणिक अर्हताधारक अध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यास तसेच शासन आदेशातील मार्गदर्शक सूचना व प्रचलित नियमांप्रमाणे विद्यापीठाने या संस्थेच्या/महाविद्यालयाच्या उपरोक्त उल्लेखित नवीन विषय/विद्याशाखा/अभ्यासक्रम/अतिरिक्त तुकडीसाठी पुढील संलग्निकरणाची प्रक्रिया सुरू करण्यास या कार्यालयाची हरकत नाही.

स्थळ- मुंबई ४००००१
दिांक- / /२०१६

सहसंचालक
उच्च शिक्षण,मुंबई विभाग,मुंबई

प्रत,

१.कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई
२.कुलसचिव, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई-२०

तसेच त्यांना कळविण्यात येते की, विद्यापीठांना त्यांच्या संलग्नीकरणात येत असलेल्या या महाविद्यालयाच्या वरील मंजूरी मिळालेल्या अभ्यासक्रमांचे विद्याशाखांचे/विहीत शैक्षणिक शुल्क विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या भौतिक सुविधा, पात्रताधारक अध्यापक वर्ग व तत्सम स्वरूपाच्या आवश्यक असणाऱ्या बाबी पूर्ण करण्याच्या सूचना तसेच बार कौन्सिल ऑफ इंडिया, एनसीटीई/एआयसीटीई यांचेकडील नाहकरत प्रमाणपत्र तात्काळ प्राप्त करण्याच्या सूचना संस्थेच्या/महाविद्यालयाच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

ही मान्यता फक्त शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पूर्वी मर्यादित असल्याने या वर्षी नवीन महाविद्यालय/अभ्यासक्रम/विद्याशाखा/विषय/तुकडया सुरू न केल्यास ही मान्यता आपोआप रद्द होईल. तसेच शासन आदेशानुसार कळविण्यात आल्याप्रमाणे शासनाने दिलेल्या अटी व शर्ती यांचे पालन होते किंवा नाही याबाबत खात्री करून संलग्निकरणाचा अहवाल शासनास व संचालनालयास पाठवून केलेल्या कार्यवाहीची प्रत या कार्यालयास पाठवावी.